Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014 Available online at www.aygrt.isrj.net

गिरणगावाचा अस्त आणि मॉल्स्चा उदय

मोहन चौगुले

राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.

सारांश - एक काळ असा होता की, कापड उद्योग व गिरण्या ही मुंबईच्या वैभवाची, प्रगतीची खूण होती. मुंबईचा ठसा म्हणजे गिरण्यांची उंचच उंच जाणारी धुरांडी ! १८५४ मध्ये मुंबईत पहिली कापड गिरणी सुरु झाली. म्हणजे आता दिडशे वर्षे उलटून गेली. त्या काळात अमेरिकेत ब्रिटीशांच्या विरोधात उठाव झाला होता. तेथून कापूस मिळणे बंद झाल्यानंतर साहजिकच भारताच्या कापसाकडे इंग्रजांचे लक्ष गेले.

प्रस्तावना-

इथला कापूस व सूत मँचेस्टरला नेऊन तयार कपडा इंग्लंड जगभर विकत असे. हळूहळू इथल्या गिरण्यांनी प्रगती केली आणि सुताबरोबरच तलम कपडाही इथे तयार होऊ लागला. १९८० पर्यंत हा धंदा मुंबईची शान होता. एकाच वेळी ५८ कापड गिरण्या सुरु होत्या आणि तिथे तीन लाखाच्या आसपास लोक काम करत होते आणि अचानक सारे चित्र बदलले.

इतिहासः

१८ जानेवारी १९८२ हा दिवस मुंबईच्या गिरणी इतिहासातला काळाकुट्ट दिवस असे आता कामगार म्हणत आहेत. पण त्यावेळी कै. डॉ. दत्ता सामंतांच्या लढाऊ बाण्याची जबरदस्त मोहिनी गिरणी कामगारांवर पडलेली होती, त्यांनी संप सुरु केला, तो संप होता तीन प्रमुख मागण्यांसाठी. एक तर मोठा बोनस आणि वेतनात मोठी वाढ हवी होती आणि बॉम्बे इंडस्ट्रीयल रिलेशन्स ॲक्ट (बीआयआरए) कायद्यात बदल हवा होता. कारण गिरणी धंद्यात मान्याताप्राप्त अशी एकच युनियन असेल. अन्य कोणत्याच युनियनला त्यात शिरता येणार नाही, अशी तरतूदी बॉंबे इंडस्ट्रीयल ॲक्टमध्ये होत्या त्या बदलाव्यात ही तिसरी मागणी डॉ. सामंतानी रेटली होती.

१८ जानेवारी १९८२ ला संपाला सुरुवात झाली व संपाला अभूतपूर्व यश मिळाले ते इतके की रखवालदारांखेरीज गिरण्यात कोणीच राहिले नाही. कामगारांनी गिरणीकडे फिरकण्याचेच सोडून दिले. यानंतर सामंतांनी पहिली चूक केली, ती अशी की, त्यांनी कामगारांना मुंबई सोडून आपल्या गावी जावयाला सांगितले. परिणाम असा झाला की, संतापलेला कामगार मुंबईत अनर्थ घडवील अशी सरकारला वाटणारी भीती आता उरली नाही. दुसरे असे की, दत्ता सामंतांची युनियन संपाचे नेतृत्व करीत असली तरी इतर युनियन्स् विराम पावल्या नव्हत्या.महाराष्ट्र गिरणी कामगार युनियन (लालबावट्याची युनियन), मार्क्सवाद्यांची युनियन, हिंद मजदूर सभेची युनियन या संघटना अस्तित्वात होत्या व संपातही होत्या. पण दत्ता सामंतांनी या युनियन्संची कधीच दखल घेतली नाही. या युनियन्सनी स्वतःच एक संपर्क समिती स्थापिली होती. दत्ता सामंतांचे थोरले बंधु दादा सामंत या समितीवर होते. पण दत्ता सामंत या संपर्क समितीच्या सभेला कधीच गेले नाहीत.

संपाचे नऊ महिने उलटले, तरी संप मजबूत होता. मोठ्या सभा होत होत्या, दगडफेक, लाठी हल्ले होत होते. कामगारांना दत्ता सामंतावरचा विश्वास कायम होता. पण संपाचा अनुभव असणारे एस. एम. जोशी, डांगे, गुलझारीलाल नंदा, यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे मोठे पुढारी अस्वस्थ होते. जिद्दीने चालविलेला हा संप मोडला, कामगार हतबल व निराशाग्रस्त झाला तर मुंबईतील पुरोगामी चळवळ संपेल व देशातील कामगार चळवळीला मोठा धोका पोहोचेल याची धास्ती या पुढा-यांना वाटत होती. एस.एम.जोशींनी तर इंदिरा गांधींशी बोलणीही केली होती. पण दत्ता सामंत या कशालाच काही किंमत द्यायला तयार नव्हते. होता होता संपाला एक वर्ष झाले. अडीच ते तीन लाख कामगार

वर्षभर संपावर आहेत, तरी सरकार त्यात लक्ष घालत नाही म्हणून डाव्या पक्षांनी लोकसभेत गदारोळ केला. तेंव्हा इंदिरा गांधींनी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याकडे चौकशीचे पत्र पाठविले. वसंतदादांनी उत्तर दिले, 'संप आता शेवटच्या घटका मोजत आहे, काही करण्याची गरज नाही !'

शेवटी गिरणी मालक संघाच्या व अनेक गिरण्यांच्या नोटीसा वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्या की १ मे १९८३ च्या आत कामगारांनी कामावर रुजु व्हावे, नाही तर त्यांना कामावर घेतले जाणार नाही. त्यापूर्वीच कामगारांचा ओघ गिरण्यांकडे वाहू लागला होता. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे व नंतर शिवसेनेच्या युनियनचे कामगार कामावर जाऊ लागले होते. नोटीस आल्यावर लाल बावटेवाल्यांनीही आपल्या कामगारांना कामावर पाठवले. १ मे १९८३ ला जगाच्या दृष्टीने संप संपला, सामंत मात्र म्हणतच राहिले की, 'संप चालूच आहे'. इतक्या शौर्याने व जिद्दीने लढविलेल्या संपाचा असा निराशेच्या उसासा देऊन शेवट झाला.

पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की, सामंताच्या संपामुळे मुंबईतील गिरण्या बंद पडल्या. पण हा समज बरोबर नाही. अहमदाबादमध्ये संप झाला नाही तरीही तिथल्या गिरण्या बंद झाल्या. खरे तर भांडवलदारांना गिरण्या बंदच करावयाच्या होत्या. पूर्वी भांडवलदारांचा कापड गिरणी हा एकच उद्योग होता. पहिल्या-दुस-या महायुध्दात मोठा नफा त्यांनी कमावला होता. आता स्वातंत्र्यानंतर व त्यातही आणीबाणी व नंतरच्या काळात सरकारने भांडवलदारांना उत्तेजन द्यायचे ठरविल्यानंतर गिरणी मालकांनी निरनिराळ्या उद्योगात स्वतःची साम्राज्ये स्थापिली होती. त्या इतर धंद्यात होणा-या फायद्याच्या मानाने कापडाच्या धंद्यातील फायदा कमी होता. एका छपराखाली निरनिराळी खाती चालवून कापड निर्माण करण्यापेक्षा बाहेरुन, असंघटीत क्षेत्रातून, कापड निर्मितीतल्या वेगवेगळ्या प्रक्रिया करवून घ्यायच्या व तयार मालावर आपला शिक्का मारुन माल विकायचा हे मालकांना सोयीचे वाटत होते. गिरण्यांच्या जागा विकून मिळणारा अफाट पैसाही त्यांना दिसत होता. तेंव्हा सामंतांमुळे मुंबईतील कापड उद्योग निकाली निघाला हे खरे नाही. गिरणी-मालक गिरण्या बंद करणारच होते. वस्त्रोद्योग संपला तो आर्थिक व व्यवस्थापकीय कारणांनी संपला.

दुसरे असे की, संप काही दत्ता सामंतांनी कामगारांवर लादला नव्हता. कामगारांनी सामंतांना संप सुरु करण्यासाठी व चालवण्यासाठी बोलावून घेतले. सामंतांनी संप प्रामाणिकपणे व जिद्दीने लढवला. त्यांच्या नेतृत्वाखालच्या कामगार संघटना मुंबईतील निरनिराळ्या कारखान्यात होत्या. त्या संघटनांचे द्रव्यबळ व मनुष्यबळ त्यांनी या लढ्यात उतरवले. कामगारही वाघासारखे लढले, पण पराभूत व उध्दवस्त झाले. केवळ कामगारच नव्हेत तर गिरणगावातील इतर छोटे उद्योग, लहान दुकानदार, व्यापारी, फेरीवाले, खानावळवाले यांनाही जबर तडाखा बसला. गिरणगावच उठल्यासारखे झाले. गिरण्यातून देखील कामगार रुजु झालेल्या कामगारांना अपमानास्पद वागणूक मिळाली. पदोपदी त्यांना हेटाळणी सहन करावी लागली, शेवटी गिरण्या बंद पडल्याच.

एलपीजीचा परिणामः

ख-या अर्थाने आज अगदी साध्या उद्योगांपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेवा, उद्योग इत्यादी बाबतीत बोलताना उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यांचा काही संबंध असतोच. संपर्क विज्ञानातील क्रांती व मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रचंड रेटयामुळे जगातील सर्वच राष्ट्रांना मग त्यांची वैचारीक बैठक कशीही असो त्यांना एलपीजी धोरण स्वीकारावे लागत आहे. एलपीजी धोरण आर्थिक वाटत असले तरी अर्थकारण हे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करीत असल्याने एकूण समाज जीवनच या बदलांमुळे ढवळून निघाले आहे. १९८० च्या दशकात जगात सर्वत्र एलपीजी वी लाट आली भारतही त्यापासून दूर राहू शकला नाही.

जागतिकीकरणाने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतरत आल्या व येत आहेत. परिणामी देशी उत्पादनाला परदेशाच्या बाजारपेठेतून चार पैसे अधिक मिळविण्यासाठी सर्वांचीच धडपड असणे साहजिकच आहे. जागतिकीकरणामुळे आलेल्या नवनवीन संधीचे सोने करण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असताना देशातील आर्थिक विषमतेची दरी मात्र रूंदावत आहे.त्यामुळे पावलोपावली मिळणारे यश हे या स्पर्धेतून येत असल्याने आर्थिकदृष्ट्या पिछाडीवर असलेला समाज अधिकच पिछाडीवर जात आहे. देशातील सर्वात माठी अर्थव्यवस्था असणारे आणि सर्वाधिक औद्योगिकरण झालेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. जगात वेगाने औद्योगिक प्रगती करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करता येईल. साहित्य, संस्कृती, शिक्षण, समाजकारण याच्या जोडीला व्यापार व उद्योगाची थोर परंपरा असणा-या राज्याने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. सध्या मात्र शेजारील गुजरात, कर्नाटक,आंध्रप्रदेश आणि दिल्ली, हरीयाणा या राज्यांनी काही बाबतीत तरी महाराष्ट्राला मागे टाकण्यास सुरूवात केली आहे.

मुंबई-पुण्याबरोबरच राज्यातील अनेक लहान मोठ्या शहरात मॉल संस्कृतीचा उदय होवू लागला आहे. मॉल्स व सुपरमार्केट मधील सतत बदलणा-या सेवांची गतीशिलता जागतिक बनू पाहणा-या या नगरांमधून दिसते. दिवसेंदिवस ही नगरे नागरी अभिजनांच्या मनोरंजनाची व सामाजिकतेची केंद्र बनत आहेत. मॉल्समध्ये विक्रीला असणा-या वस्तूंमध्ये विविधता असते आणि निवडीला वाव असतो. यातील काही वस्तुंच्या किंमती ह्या स्थानिक पारंपरिक बाजारातील वस्तुंपेक्षा ब-याच चढ्या असतात परंतु कुटुंबाची सोय आणि वेळेची बचत होते म्हणून कमावत्या पती-पत्नी मॉल्समधील खरेदीला प्राधान्य देतात. त्यामुळे मुंबई महानगरामध्ये मॉल्सचे प्रस्थ वाढत चालले आहे. थोडक्यात काळाबरोबर राहणे हा महाराष्ट्राचा आजवरचा इतिहास आहे.यामुळेच आजच्या या ग्लोबल व्हीलेजमध्ये महाराष्ट्राने व मुंबईने आपले वेगळे स्थान राखण्यात यश प्राप्त केले आहे. मुंबई-पुणे -नाशिक या ट्रँगलमध्ये आयटी/बीटी पार्क, टेक्सटाईल पार्क, वाईन पार्क, फूड पार्क, ॲटो क्लस्टर, एसईझेड या नव्या संकल्पनांतून अनेक लहान-मोठे उद्योग उभारले जात आहेत. त्यासाठी मुंबईमध्ये मोठया प्रमाणात जमिनीची आवश्यकता भासते. १९८२ पासून बंद असलेल्या कापड गिरण्यांच्या जमिनीवर या नव्या कंपन्याचा , उद्योगपतींचा व सरकारचा डोळा आहे. मध्य मुंबईतील या बंद गिरण्यांच्या खाली ३०० ते ४०० एकर एवढी प्रचंड जमिन आहे. दहा हजार कोटी रूपये हे या

जमिनीचे किमान मूल्य आहे. एनटीसीने ज्या आठ-दहा गिरण्यांच्या जमिनी आतापर्यंत विकल्या, त्यात त्यांना चार हजार कोटी रूपये मिळालेले आहेत. गिरण्यांच्या जमिनीवर चाळीत वसलेल्यांना नवी घरे मालकीने देण्याचा पवित्राही तेवढाच फसवा आहे. कारण मध्य मुंबईत जागा व घरांच्या किंमती अफाट आहेत उपनगरात स्वस्त घरे मालकीची करून सोन्यासारखी जमीन मोकळी करण्यासाठी हे औदार्य दाखविले जात आहे. जिथे तीन लाख कुटुंबे आपले पोट भरत होती तिथे आज श्रीमंत वर्गाचे चोचले पुरविणारी महागडी दुकाने, हॉटेल्स, टॉवर्स, मॉल्स उभे राहीले आहेत. त्यामुळे पूर्वी मुंबईची शान म्हणून दिसणारी उंच-उंच धुराडी केविलवाणी होवून या अमूलाग्र बदलांकडे पाहात असतात. पण प्रत्यक्षात न्यायाची व्याख्या काय करायची? जेंव्हा बेमुदत संपाने गिरण्या थंडावल्या तेंव्हा तिशीत असलेला कामगार आज साठीच्या घरात पोहोचला असणार. नव्या व्यवस्थेत तो कोणते व कसले कष्ट करणार आहे? तेंव्हाचा तरुण विशीतला आज पन्नाशीत गेला आहे, मग याला कामगारांचे पुनर्वसन म्हणायचे, म्हणजे नेमके काय ? उध्दवस्त आयुष्य अशा पुनर्वसनाने कसे पुन्हा जीव धरणार आहे ? सरकार आणि मालकांवर दोषारोप करणे सोपे आहे, पण कामगार संघटना व नेत्यांच्या अतिरेकामागे फरफटत जाणा-या कामगारांसाठी हा डोळ्यात अंजन घालणारा धडा आहे. आजारी गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण हा त्या काळातला परवलीचा शब्द होता. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री मुंबईत उद्घाटनाला आले. जमिनी किती कोटींना विकणार त्याचे आकडे जगजाहीर आहेत. त्या जमीनींचे मोल सरकारच्या खात्यात जमा होणार आहे. परंतु या जमिनी विकण्यासाठी व त्यातून कमाई करण्यासाठी शासनाने या गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण केले होते काय ? असा प्रश्न मनाला भेडसावतो आहे. मालकांना लबाड ठरवून गिरण्या ताब्यात घेणा-या सरकारने त्यांच्यापेक्षा कोणती वेगळी कल्याणकारी नीती अवलंबली ? तुंबड्या भरणारे मालक आणि त्याच वाटेने जाणारे सरकार यात फरक कुठला ?

निष्कर्ष :

मुंबईसह भारतातील रोजगारवृध्दीसाठी कामगार कायद्याची पूर्ण चिकित्सा करून त्यात कालानुरूप योग्य त्या दुरूस्त्या काणे गरजेचे आहे. कामगार कायदे काही प्रमाणात शिथिल करून कामगारांची व्यावसायिक गतिशिलता वाढविता येईल या संदर्भात शिथिलतेचा समजूतदारपणे विचार करण्याची गरज आहे. इंग्लंड, अमेरिका, चीन या देशामध्ये कामगार विषयक बाबींमध्ये लवचिकता असल्याने कालानुरूप त्यात हवा तसा बदल करण्यात आला. त्यामुळे या देशातील बेरोजगाराचा दर इतर देशांच्या मानाने फारच कमी आहे.

१९९१ पूर्वी भारतातील उद्योगांना अनेक प्रकारचे संरक्षण मिळत होते. ते आज राहीले नाही. एलपीजीमुळे संरचनात्मक आणि तंत्र वैज्ञानिक बदल घडून येत आहेत. त्यामुळे देशातील उद्योगांचा जुना ढाचा बदलून त्याऐवजी नवा आकृतीबंध आकार घेत आहे. जुन्या रोजगाराच्या संधी नाहीशा होवून नवनिर्मितीमध्ये नव्या संधी उपलब्ध होत आहेत. रोजगाराच्या जुन्या क्षेत्रातून बाहेर पडून नव्या रोजगार संधीचे स्वागत केले पाहीजे. नवे बदल आत्मसात करून नव्या रोजगारासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेणे व कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. कामगारवर्गात अशी लवचिकता, परिवर्तन क्षमता असेल तर बेरोजगाराचे गांभीर्य कमी होवू शकते. नव्याने कामगार विषयक सुधारणांना अग्रक्रम दिला पाहीजे. कालबाह्य झालेले कामगार कायदे बदलणे आवश्यक आहे असे मत पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग आणि इतर अर्थतज्ञांनी व्यक्त केले आहे. १९९१ पासून आर्थिक सुधारणा केंद्रस्थानी ठेवण्यात आल्या मात्र या सुधारणांमध्ये जुन्या कामगार कायद्यात बदल करण्याचे धाडस झाले नाही कारण कामगार सुधारणा हा विषय राजकीयदृष्ट्या एक नाजूक विषय आहे. एकूण सुमारे ४० कोटी कामगारांपैकी ३ कोटी संघटीत क्षेत्रातील कामगार

आहेत. ही संख्या जरी तुलनेने कमी असली तरी वर्चस्वी व प्रभावी आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थीतीनुसार कामगार कायद्यात बदल करण्याच्या प्रयत्नांना सध्याच्या कामगार संघटना कसून विरोध करीत आहेत. मॉन्टेकसिंग अहलुवालिया समिती, व्दितीय राष्ट्रीय कामगार आयोग, एस. पी. गुप्ता समिती या सर्वांनी "भारतीय कामगार कायदे कालबाह्य झाले आहेत त्यामुळे बदलत्या आर्थिक सुधारणांशी सुसंगत कायदे करण्याची सुचना केली आहे." याकडे अद्यापपर्यंत शासनाने गांभिर्याने पाहीलेले नाही.

जर भारताला चीन बरोबर व्यापारी स्पर्धा करावयाची असेल तर उत्पादन खर्च कमी करावा लागेल त्यासाठी चीनप्रमाणे कंत्राटी कामगार पध्दती आणली पाहीजे. भारतामध्ये कापड उद्योग व सेवा क्षेत्रात कंत्राटी कामगार भरतीला चांगली संधी आहे. मात्र या ठिकाणी कंत्राटी कामगार वेठबिगार होणार नाहीत याची दक्षता घेणे गरजेचे आहे. अलिकडच्या काळात संघटीत क्षेत्रातील रोजगार निर्मितीचा दर वाढू शकला नाही मात्र असंघटीत क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. कामगार सुधारणा कशा हितावह आहेत? हे कामगार वर्गाला समजावून सांगितले पाहीजे. याबाबतीत कामगारांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. कामगार लवचिकता

जितकी अधिक तितका रोजगाराचा वृध्दीदर वाढू शकतो. असक इतर देशांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. परिवर्तन ही काळाची गरज आहे हे लक्षात घेवून कामगार, कामगार संघटना, उद्योगपती आणि सरकार या सर्वांनी बदलत्या परिस्थतीबरोबर सुधारणा करण्याविषयी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

टीपः एलपीजी – लिब्रलायझेशन,प्रायव्हेटायझेशन ॲण्ड ग्लोबलायझेशन

संदर्भ सूचीः

१. दातार भ. ना., भारतीय कामगार, आंबेडकर इन्स्टिट्यूट फॉर लेबर स्टडीज, मुंबई, १९८६
२. कदम मनोहर, भारतीय कामगार चळवळीचे जनक, नारायण मेघाजी लोखंडे, अक्षर प्रकाशन, पुणे,१९९५.
३. कटकम अनुपमा, दि व्हॉनिसिंग मिल्स लॅन्डस्, फ्रंटलाईन, सप्टेंबर १०/२३, २००५.
४. आडारकर नीरा आणि मेनन मीना, कथा मुंबईच्या गिरणगावाचीः गिरणी कामगारांचा मौखिक इतिहास, मौज प्रकाशन, मुंबई,२००७
५. जोशी शरद, रोजगार, अर्थसंवाद, जानेवारी/मार्च आणि एप्रिल/जून २००८.
६. साक्षी, काल आज आणि उद्या, गिरणगावाचा शेवट, नवभारत, वाई, जानेवारी,२०१०
७. सकाळ टाईम्स, मिल्स व्हर्सेस मिल्स, १८ जानेवारी,२०१०
८. दैनिक पुढारी, कोल्हापूर,दि. २५ जानेवारी २०१०.